Registered Office : Plot No. CF-18/2, Street No. 175, Action Area 1C, New Town, Kolkata - 700156, West Bengal
Phone : 91-33-2340-0000
• Website : www.mstcindia.co.in • Email : cssectt@mstcindia.in

NOTICE FOR CONVENING
61ST ANNUAL GENERAL MEETING THROUGH VC/OAVM

Members may please note that 61st Annual General Meeting ("AGM") of the members of MSTC Limited ("Company") will be held on **Thursday, 24th September, 2026, at 11:00 A.M. (IST)** through Video Conferencing ("VC") / Other Audio Video Means ("OAVM") in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder and the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with General Circular no. 03/2025 dated 22nd September, 2025 issued by Ministry of Corporate Affairs (MCA), to transact the businesses set out in the Notice calling the AGM.

In compliance with the above MCA Circulars and provisions of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, electronic copies of the Notice of AGM and Annual Report for the financial year 2025-26 will be sent through email mode to all those members whose email addresses are registered with the Company/Depository Participant(s). Members are requested to update their email address immediately to enable the company to send the copy of annual report and notice of AGM to the shareholders. The Notice of AGM and Annual Report will also be available on the Company's website at **www.mstcindia.co.in** and on the website of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at **www.bseindia.com** and **www.nseindia.com** respectively and on the website of NSDL at **https://www.evoting.nsdl.com**. Members can attend and participate in the AGM through the VC/OAVM facility only. The instructions for joining the AGM through VC/OAVM will be provided in the Notice of AGM. Members attending the meeting through VC/OAVM shall be counted for the purpose of reckoning the quorum under section 103 of the Companies Act, 2013.

Manner of registering/ updating email addresses :

- **Members holding share(s) in physical mode** are requested to send duly filled up and signed Form ISR-1 mentioning e-mail id alongwith requisite enclosures, through email to MSTC Limited at **cssectt@mstcindia.in** or to the RTA, Bigshare Services Private Limited at **vinod.y@bigshareonline.com**. Format of Form ISR-1 can be downloaded from the link https://www.mstcindia.co.in/ cms/Investor/Investor-Service-Related-Form.pdf.
- **Members holding share(s) in Demat/Electronic mode** are requested to register/update their e-mail addresses with their respective Depository Participants for receiving all communications from the Company electronically.

Manner of registering/ updating bank details for receiving dividends directly in bank accounts through NECS :

- **Members holding share(s) in physical mode** are requested to send duly filled up and signed Form ISR-1 mentioning bank details alongwith requisite enclosures and duly filled and signed Form ISR-2, through email to MSTC Limited at **cssectt@mstcindia.in** or to the RTA, Bigshare Services Pvt. Ltd. at **vinod.y@bigshareonline.com**. Format of Form ISR-1 & Form ISR-2 can be downloaded from the link https://www.mstcindia.co.in/cms/Investor/Investor-Service-Related-Form.pdf.
- **Members holding share(s) in Demat/Electronic mode** are requested to register/ update their bank details with their respective Depository Participants.

Manner of casting Vote through e-voting :

- Shareholders will have an opportunity to cast their votes remotely on the businesses as set forth in the Notice of the AGM through remote e-voting system from **Sunday, September 20, 2026 at 9:00 A.M.** till **Wednesday, September 23, 2026 at 5:00 P.M.** The facility for e-voting will also be made available during the AGM. Detailed procedure for remote e-voting and e-voting during the time of AGM will be provided in the Notice of AGM.
- The login credentials for casting the votes through e-voting shall be made available to the members through e-mail after successfully registering their email addresses in the manner provided above.

Manner of attending AGM through VC/OAVM :

Facility to attend the AGM through VC/OAVM will be available through the NSDL e-Voting system at **www.evoting.nsdl.com**. Members are requested to carefully read the notes set out in the Notice of the AGM with respect to instructions for attending the AGM through VC/OAVM and for remote e-voting and e-voting at the AGM.

This notice is being issued for the information and benefit of all the members of the Company in compliance with the applicable circulars of the MCA and SEBI.

For MSTC Limited
Sd/-
Ajay Kumar Rai
Company Secretary & Compliance Officer

Date: 20.08.2026
Place: Kolkata

सुथारकडून श्रीलंकेची फिरकी

पहिल्या कसोटीत भारतीय संघाची १६५ धावांनी बाजी

वृत्तसंस्था, गॉल

प्रतिभावंत डावखुरा फिरकीपटू मानव सुथारच्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर भारताने पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात यजमान श्रीलंकेचा १६५ धावांनी धुव्वा उडवला आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेची अंतिम फेरी गाठण्याच्या आशांना बळकटी दिली. कसोटी कारकीर्दीतील केवळ दुसऱ्याच सामन्यात सुथारने १० बळी मिळवण्याची किमया साधली. त्याने दुसऱ्या डावात ५५ धावांत ६ बळी घेत श्रीलंकेच्या डावाला खिंडार पाडले. त्याच्या या जादुई कामगिरीमुळेच भारताला दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेता आली.

गॉल येथे झालेल्या या कसोटीत श्रीलंकेसमोर विजयासाठी ३७२ धावांचे आव्हान होते. याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा दुसरा डाव पाचव्या दिवशी उपाहारानंतरच्या सत्रात २०६ धावांत संपुष्टात आला. त्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत मुसळधार पाऊस सुरू झाला. त्यामुळे सुथारने अखेरच्या १० चेंडूंत मिळवलेले चार बळी निर्णायक ठरले. त्याने पहिल्या डावातही ७६ धावांत ४ गडी बाद केले होते.

पाचव्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा श्रीलंकेची ४ बाद ८४ अशी स्थिती होती. श्रीलंकेला आणखी २८८ धावांची, तर भारताला सहा बळींची आवश्यकता होती. पहिल्या डावातील शतकवीर सोनल दिनुशा (१२८ चेंडूंत ८४) आणि कर्णधार धनंजय डी सिल्वा (१५१ चेंडूंत ५९) या श्रीलंकेच्या पाचव्या जोडीने भारतीय गोलंदाजांच्या संयमाची कसोटी पाहिली. दोघांनी २०२ चेंडूंत ९५ धावांची भागीदारी करत भारताला तासाभराहून अधिक काळ प्रतीक्षा करायला लावली. अनुभवी रवींद्र जडेजाने सातत्याने अचूक टप्प्यावर मारा करत फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. अखेर त्यालाच ही जोडी फोडण्यात यश आले. त्याने डी सिल्वाला सुथारकरवी झेलबाद करत भारताला मोठा दिलासा दिला.

त्यानंतर निरोशन डिकवेलाने (१०) वेगाने धावा काढण्याचा प्रयत्न केला. कुलदीप यादव आणि जडेजाविरुद्ध त्याने स्लॉग स्वीपचे फटके मारले, तर प्रसिद्ध कृष्णाच्या आखूड चेंडूंवर सतत क्रीजमध्ये हालचाल केली. अखेर प्रसिद्धच्या चेंडूवर कव्हर्सच्या दिशेने फटका मारण्याच्या प्रयत्नात त्याचा यष्टिरक्षक ऋषभ पंतने झेल घेतला. त्यानंतर दिनुशा आणि केशरा नुवंथा (२०) जोडीने आणखी १५ षटके खेळून काढली. भारताने नव्या चेंडूची वाट पाहत संयमाने गोलंदाजी सुरू ठेवली होती. मात्र, ७६व्या षटकात सुथार पुन्हा गोलंदाजीला येताच डावाचे चित्र पालटले. त्याच्या अपेक्षेपेक्षा अधिक उसळी मिळालेल्या चेंडूने दिनुशाला निष्प्रभ केले. त्यानंतर श्रीलंकेच्या शेवटच्या तीन फलंदाजांना सुथारने केवळ सहा चेंडूंत माघारी धाडत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

७ परदेशातील कसोटीत दोन डावांत मिळून १० गडी बाद करणारा मानव सुथार हा भारताचा एकूण सातवा फिरकीपटू ठरला. यापूर्वी रविचंद्रन अश्विन (दोनदा), बिशन सिंग बेदी, इरापल्ली प्रसन्ना, चंद्रशेखर, अनिल कुंबळे आणि हरभजन सिंग यांनी अशी कामगिरी केली आहे.

'डब्ल्यूटीसी' गुणतालिकेत आगेकूच

श्रीलंकेवरील विजयासह भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या गुणतालिकेत एका स्थानाच्या सुधारणेसह पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. भारताची गुणांची टक्केवारी ५३.३३ झाली आहे. श्रीलंका 'डब्ल्यूटीसी' गुणतालिकेत सहाव्या स्थानावर असून, त्यांची गुणांची टक्केवारी ३३.३३ आहे.

संक्षिप्त धावफलक

- **भारत (पहिला डाव) :** ४६२
- **श्रीलंका (पहिला डाव) :** २८४
- **भारत (दुसरा डाव) :** १९३
- **श्रीलंका (दुसरा डाव) :** ७७.४ षटकांत सर्वबाद २०६ (सोनल दिनुशा ८४, धनंजय डी सिल्वा ५९, केशरा नुवंथा २०; मानव सुथार ६/५५, प्रसिध कृष्णा २/१६, मोहम्मद सिराज १/१५, रवींद्र जडेजा १/७१)
- **सामनावीर :** देवदत्त पडिक्कल

महिला हॉकी संघाची आज इंग्लंडशी गाठ

ॲमस्टेलवीन : बलाढ्य चीनला बरोबरीत रोखल्यानंतर दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय मिळवणारा भारतीय महिला हॉकी संघ विश्वचषक स्पर्धेत आज, गुरुवारी इंग्लंडविरुद्ध खेळणार आहे. स्पर्धेची दुसरी फेरी गाठण्यासाठी भारताला 'ड' गटातील हा सामना किमान बरोबरीत सोडवणे आवश्यक आहे. भारत आणि चीनचे समान चार गुण असून इंग्लंडचे तीन गुण आहेत. त्यामुळे या सामन्यात पराभव झाल्यास भारताचे आव्हान धोक्यात येईल.

- **वेळ :** सायं. ६.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स २, जिओहॉटस्टार ॲप.

क्रीडा पुरस्कार नामांकन प्रक्रिया पुढील महिन्यापासून?

नवी दिल्ली : सरकारच्या वतीने २०२६च्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांसाठीची नामांकन प्रक्रिया पुढील महिन्यात सुरू होण्याची दाट शक्यता आहे. ही नामांकन प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने राबवली जाते. पात्र खेळाडूंना कोणत्याही शिफारसपत्राशिवाय थेट आपली नावे पाठवण्याची परवानगी असते. यासाठी अद्याप निश्चित तारीख जाहीर करण्यात आलेली नाही, असेही सूत्राने सांगितले. २०२५च्या क्रीडा पुरस्कारांची घोषणा मंगळवारी करण्यात आली. संपूर्ण प्रक्रियेच्या पुनर्मूल्यांकनामुळे पुरस्कार विजेत्यांची नावे जाहीर करण्यास विलंब झाला.

'पारंपरिक' लढतीत भारतच सरस

पाकिस्तानवरील रोमहर्षक विजयासह दुसऱ्या फेरीत प्रवेश

विश्वचषक हॉकी स्पर्धा

वृत्तसंस्था, ॲमस्टेलवीन

भारतीय पुरुष संघाने हॉकीच्या मैदानावर गेल्या दशकभरापासूनचे पाकिस्तानवरील वर्चस्व कायम राखले. कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि अभिषेक यांच्या प्रत्येकी दोन गोलच्या जोरावर भारताने बुधवारी विश्वचषक स्पर्धेत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५-३ असा पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने 'ड' गटातून इंग्लंडपाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

भारतीय संघाने सलामीला वेल्सचा पराभव केला होता, तर दुसऱ्या सामन्यात त्यांना इंग्लंडने नमवले होते. त्यामुळे स्पर्धेतील आव्हान कायम राखण्यासाठी भारताला किमान बरोबरी आवश्यक होती. मात्र, भारताने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करताना विजयाची नोंद केली. गटातील अन्य सामन्यात इंग्लंडने वेल्सचा ८-२ असा धुव्वा उडवत साखळीतील तीनही सामने जिंकले आणि गटात अव्वल स्थान कायम राखले. इंग्लंड संघ तीन गुण आणि सकारात्मक गोलफरकासह दुसऱ्या फेरीत प्रवेश करेल.

अखेरच्या साखळी सामन्यातील वेगवान खेळामुळे तब्बल आठ गोलची नोंद झाली. भारताकडून हरमनप्रीत सिंग (पाचव्या, २१व्या मिनिटाला) आणि अभिषेकने (११व्या, २४व्या मि.) प्रत्येकी दोन, तर हार्दिक सिंगने (३५व्या मि.) एक गोल केला. पाकिस्तानकडून हन्नान शाहिदने (२२व्या, ४६व्या मि.) दोन, तर सुफियान खानने (२४व्या मि.) एक गोल नोंदवला.

भारताने सामन्याला वेगवान सुरुवात केली. पाचव्या मिनिटाला मिळालेल्या पहिल्याच पेनल्टी कॉर्नरवर कर्णधार हरमनप्रीतने पारंपरिक ड्रॅग-फ्लिकचा अचूक वापर करत चेंडू खालच्या उजव्या कोपऱ्यात धाडला आणि भारताचे खाते उघडले. त्यानंतर सहा मिनिटांनी अभिषेकने डाव्या बाजूने उत्कृष्ट खेळ करत गोलपोस्टसमोर अप्रतिम ड्रिबलिंग केले आणि भारताचा दुसरा गोल नोंदवला. २१व्या मिनिटाला हरमनप्रीतने पुन्हा चमक दाखवली. या गोलनंतर पाकिस्तान संघाने कामगिरी उंचावली. एका मिनिटानंतर हन्नान शाहिदने आपल्या वेगाच्या जोरावर उत्कृष्ट मैदानी गोल करत पाकिस्तानचे खाते उघडले. पुढेही पाकिस्तानने आव्हान उपस्थित केले. मात्र, भारताने त्यांचे प्रयत्न हाणून पाडत विजय मिळवला.

२१ भारतीय पुरुष हॉकी संघाने पाकिस्तानविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांनी गेल्या १० वर्षांत आणि २१ सामन्यांत एकही पराभव पत्करलेला नाही. पाकिस्तानने भारतावरील अखेरचा विजय २०१६च्या दक्षिण आशियाई स्पर्धेत मिळवला होता. त्यानंतर भारताने २१ पैकी १८ सामने जिंकले असून दोन सामने बरोबरीत सुटले आणि एक सामना पावसामुळे रद्द झाला.

आयुष, सिंधूची आगेकूच

लक्ष्य, उन्नतीचे आव्हान संपुष्टात

जागतिक बॅडमिंटन स्पर्धा

नवी दिल्ली : भारताचा उगवता तारा आयुष शेट्टी आणि सहाव्या जागतिक पदकासाठी उत्सुक असलेली पी. व्ही. सिंधू यांनी जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत सलग दुसरी लढत जिंकत उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्याच वेळी लक्ष्य सेन आणि उन्नती हुडा यांचे आव्हान मात्र संपुष्टात आले.

घरच्या प्रेक्षकांच्या मोठ्या पाठिंब्यासह खेळताना सिंधूने कॅनडाच्या वेन यू झँग हिचे आव्हान २१-१६, २१-१७ असे सहज संपुष्टात आणले. पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या शी युकीला पराभूत करून सनसनाटी निर्माण करणाऱ्या २१ वर्षीय आयुष शेट्टीने आपली विजयी घोडदौड कायम राखली. त्याने श्रीलंकेच्या दुमिंदू अबेविक्रमा याच्याविरुद्ध २१-८, २१-१० असा अत्यंत एकतर्फी विजय मिळवला.

जागतिक स्पर्धेतील माजी कांस्यपदक विजेत्या लक्ष्य सेनला पुरुष एकेरीत अमेरिकेच्या गॅरेट टॅनचा सामना करता आला नाही. त्याने हा सामना २१-१९, १९-२१, १७-२१ असा गमवला. पहिल्या फेरीत चमकदार विजय मिळवणाऱ्या उन्नती हुडाचे आव्हानही संपुष्टात आले. महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत कॅनडाच्या मिशेल लीविरुद्ध तिला २१-११, ९-२१, २१-२३ असा पराभव स्वीकारावा लागला.

मिश्र दुहेरीत तनिषा क्रॅस्टो आणि ध्रुव कपिला जोडीने मकाऊच्या लिओंग इओक चॉन्ग आणि एनजी वेंग ची यांचा २१-११, २१-११ असा पराभव करत आगेकूच केली. भारताची पुरुष दुहेरीतील अव्वल जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना एकही लढत न खेळता उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळाला. दुसऱ्या फेरीतही भारतीय जोडीला पुढे चाल मिळाली.

प्रज्ञानंद संयुक्त आघाडीवर

सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ

सेंट लुईस : भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने प्रतिष्ठेच्या सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत जेतेपदाच्या आशा कायम राखल्या आहेत. आठव्या फेरीत त्याने फ्रान्सच्या मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्हला पराभूत करताना गुणतालिकेत संयुक्त आघाडी मिळवली. केवळ एक फेरी शिल्लक असताना प्रज्ञानंद आणि अमेरिकेचा वेस्ली सो यांचे समान पाच गुण झाले आहेत.

आठव्या फेरीच्या लढतीत वेस्ली सो याला अमेरिकेच्याच सॅम्युएल सॅव्हियनने बरोबरीत रोखले. त्याच वेळी उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोवने सलग तिसऱ्या विजयाची नोंद करताना जेतेपदासाठी दावेदारी भक्कम केली. तो प्रज्ञानंद आणि वेस्ली यांच्यापेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे आहे. त्याने नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टचा पराभव केला. आठव्या फेरीतील सर्वांत धक्कादायक निकाल जर्मनीच्या व्हिन्सेंट केमेरने नोंदवला. त्याने अग्रमानांकित अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनावर विजय मिळवला.

जलद प्रकारात विवान विजेता

कनिष्ठ आशियाई बुद्धिबळ

मुंबई : कनिष्ठ गटाच्या आशियाई बुद्धिबळ स्पर्धेतील जलद (रॅपिड) प्रकारात भारताच्या विवान विशाल आणि तुर्कमेनिस्तानच्या शोहरादोव्हा लाला यांनी अनुक्रमे खुल्या व मुलींच्या गटाचे विजेतेपद पटकावले.

खुल्या गटातील स्पर्धेच्या मध्यात कझाकस्तानचा अखिलबे इमांगाली आणि भारताचा माधवेंद्र प्रताप शर्मा आघाडीवर होते. मात्र, निर्णायक फेऱ्यांमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागल्याने चुरस निर्माण झाली. याचा फायदा घेत विवानने सात फेऱ्यांत सहा गुणांसह किताब पटकावला. आंतरराष्ट्रीय मास्टर अक्षय बोरगावकर व अपूर्व कांबळे यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळवले.

IDBI BANK
CIN: L65190MH2004GOI148838

आयडीबीआय बँक लिमिटेड, रिटेल रिकव्हरी डिपार्टमेंट, आयडीबीआय बँक - देवनार शाखा, युनिट नं.१, सफल प्राईड, सायन-ट्रॉम्बे रोड, देवनार, मुंबई पिन : ४०००८८, महाराष्ट्र टेलि. नं. : ०२२-२०८५१४३४/३५

जाहीर सूचना - सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी ॲक्ट) अंतर्गत सूचना

सूचना याखाली नमूद केलेल्या ऋणको व गहाणकारांना देण्यात आली आहे की, खालील तालिकेत नमूद केलेल्या ऋणकोंनी गृहकर्ज / गहाणवट कर्जामार्फत "आयडीबीआय बँक लि."द्वारा (आयडीबीआय बँक) वित्तीय सहाय्य मंजूर केले होते. उक्त वित्तीय सहाय्याच्या मंजूरीच्या अनुसार, आवश्यक कर्ज व सुरक्षा कागदपत्रे ऋणको / गहाणकाराद्वारा निष्पादित केली होती. उक्त वित्तीय सहाय्य याखाली तालिकेत नमूद केलेल्या मालमत्तेचा नामाधिकार विलेख जमा करून गहाणवटीमार्फत, इतर गोष्टींसमवेत, सुरक्षित आहे. कर्ज करारनाम्याच्या अनुसार उक्त वित्तीय सहाय्याची परतफेड करण्यास ऋणको असमर्थ ठरल्यामुळे, ऋणकोंच्या खात्यांचे वेळोवेळी भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा (आरबीआय) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूत्रांच्या अनुसार "आयडीबीआय बँके"च्या बुक्समध्ये नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. ऋणकोंद्वारा परतफेडीत कसूर झालेली लक्षात घेता, "आयडीबीआय बँके"ने, तिच्या पत्राद्वारे, ऋणकोद्वारा त्वरित देणी व देय बनलेली रक्कम व त्यावरील व्याजासह एकत्रित वित्तीय सहाय्य घोषित केले आहे आणि उक्त पत्रात नमूद केल्यानुसार संविदात्मक दरात, प्रदान व वसूलीपर्यंत त्यावरील पुढील व्याजासह एकत्रित रक्कम "आयडीबीआय बँके"ला प्रदान करण्याकरिता ऋणकोंना फर्मावियात आले आहे. रक्कम प्रदान/ वसूलीपर्यंत संविदात्मक दरात त्यावरील पुढील व्याजासह आयडीबीआय बँकेकरिता ऋणकोद्वारा देय व देणी आहे.

"ॲकनॉलेजमेंट ड्यूसह रजिस्टर्ड पोस्टाने" ऋणको/ गहाणकारांच्या संबंधित पत्त्यांवर सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत "आयडीबीआय बँके"द्वारा आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आली होती/ पोचविण्यात आली होती, जी न पोहचताच परत आली होती. पूर्वोक्त बाब लक्षात घेवून, ही जाहीर सूचना सरफेसी रूल्सच्या रुल ३(१) च्या तरतूदींच्या अनुपालनार्थ निर्गमित करण्यात आली आहे.

कृपया नोंद घ्यावी की, तुम्हास "आयडीबीआय बँके"च्या पूर्व-लेखी संमतीशिवाय कोणत्याही सुरक्षित मत्तेचे हस्तांतरण किंवा अन्य कोणत्याही मार्गे (तुमच्या सामान्य व्यवसायाखेरीज) हस्तांतरण करता येणार नाही, त्यास असमर्थ ठरल्यास तुम्ही सरफेसी ॲक्टच्या सेक्शन २९ अंतर्गत दंडनिय गुन्ह्यास पात्र ठरणार आहात. आम्ही सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधीत आहोत.

वरील अनुषंगाने, ऋणको/ गहाणकारांना, पुन्हा एकदा विनंती करण्यात येते की, त्यांनी आजच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत पूर्वोक्त रकमेचे प्रदान करावे, त्यास असमर्थ ठरल्यास "आयडीबीआय बँक", सुरक्षित धनको असलेली, सरफेसी ॲक्टच्या तरतुदीअंतर्गत तिच्या सुरक्षा हिताची अंमलबजावणी करण्यास तसेच "आयडीबीआय बँके"च्या देणींच्या वसुलीकरिता बँकेस उपलब्ध असल्यानुसार अन्य कोणत्याही कायद्यांतर्गतसुद्धा हक्कदार असणार आहे.

ऋणको/ गहाणकाराचे नाव	मागणी सूचना तारीख	मागणी सूचना रक्कम (रु.)	मालमत्तेचा सविस्तर पत्ता
श्री./ श्रीमती राधा मुर्जी वाविया व श्री./ श्रीमती मुर्जी देवजी वाविया एलएएन नं. : ०३०२६७५१०००२६६००, ०३०२६७५१०००२६७६१ व ०३०२७७८००००००२४०	२३.०७.२०२६	रु. ७९,९३,३३७.२०/- (रुपये एकोणऐंशी लाख त्र्याण्णव हजार तीनशे सदोतीस व पैसे वीस फक्त)	फ्लॅट नं. १४०२, आरएन हाईट्स, प्लॉट नं. १३६, सेक्टर - ५०, द्रोणागिरी उरण, महाराष्ट्र - ४०० ७०२.

स्थळ : मुंबई
दिनांक : २०.०८.२०२६

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी,
आयडीबीआय बँक लि.

LTM
A Larsen & Toubro Group Company

एलटीम लिमिटेड
(पूर्वीचे एलटीआय माइंडट्री लिमिटेड)
सीआयएन: L72900MH1996PLC104693
नोंदणीकृत कार्यालय: एल ॲण्ड टी हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१, भारत
दू.क्र.: +९१ ९२४०२९७५००; **ई-मेल:** investor@ltm.com, **संकेतस्थळ:** www.lti.com

सूचना

कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीकडे (आयईपीएफ) हस्तांतरण

सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) मधील तरतुदी आणि त्यासोबत 'गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६' (नियम) यांच्या अनुषंगाने, ज्या शेअर्सवरील लाभांश सलग सात वर्षांपासून दावा न करता तसाच राहिला आहे, ते शेअर्स 'गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी' (आयईपीएफ) कडे हस्तांतरित करणे कंपनीसाठी अनिवार्य आहे.

नियम आणि तरतुदींनुसार, सलग सात वर्षांच्या कालावधीसाठी दावा न केलेला लाभांश आणि ज्या शेअर्सवरील लाभांशाचा दावा मागील सलग सात वर्षांत केला गेला नाही, असे कंपनीचे शेअर्स ' आयईपीएफ' च्या खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

'आयईपीएफ' कडे जमा करावयाच्या अशा लाभांशाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

अनु क्रमांक	लाभांश जाहीर केल्याची तारीख	लाभांशाचा प्रकार	आर्थिक वर्ष	ज्यांच्याद्वारे जाहीर केला	लाभांश मिळण्याचा दावा करण्याची अंतिम तारीख	ज्या तारखेपासून शेअर्स आयईपीएफ कडे हस्तांतरित होण्यास पात्र ठरतील
१.	१६ ऑक्टोबर २०१९	अंतरिम	२०१९-२०	माइंडट्री लिमिटेड, जी आता कंपनीमध्ये विलीन झाली आहे	२० नोव्हेंबर २०२६	२१ नोव्हेंबर २०२६
	१७ ऑक्टोबर २०१९			एल अँड टी इन्फोटेक लिमिटेड		

नियमांचे पालन करून, ज्या संबंधित सदस्यांचे शेअर्स आयईपीएफ (गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी) कडे हस्तांतरित होणे अपेक्षित आहे, त्यांना वैयक्तिक सूचना पाठवल्या जात आहेत. अशा सदस्यांचा तपशील (शेअर्स आणि लाभांश) कंपनीच्या https://www.ltm.com/investors/investor-services/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

संबंधित सदस्यांना विनंती आहे की, त्यांची लाभांश रक्कम किंवा शेअर्स आयईपीएफ कडे हस्तांतरित होण्यापासून रोखण्यासाठी, त्यांनी वर दिलेल्या तक्त्यानुसार विहित तारखेला किंवा त्यापूर्वी लाभांशाचा दावा करावा.

जर कंपनीला वर नमूद केलेल्या कालावधीत संबंधित सदस्यांकडून वैध दावा प्राप्त झाला नाही, तर कंपनी कोणताही पुढील नोटीस न देता न-दावा केलेला लाभांश आणि शेअर्स आयईपीएफ कडे हस्तांतरित करेल.

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, आयईपीएफ कडे हस्तांतरित केलेल्या शेअर्स आणि न-दावा केलेल्या लाभांशाबाबत कंपनीविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही. तथापि, सदस्य नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आयईपीएफ कडे अर्ज करून ते परत मिळवण्याचा दावा करू शकतात.

वरील संदर्भात कोणत्याही शंका किंवा प्रश्न असल्यास सभासद कंपनीचे निबंधक आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए), मेसर्स एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याशी सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई-४०० ०८३, महाराष्ट्र, भारत येथे संपर्क साधू शकतात किंवा rnt.helpdesk@in.mpms.mufg.com या ई-मेल आयडीवर किंवा https://swayam.in.mpms.mufg.com/ येथे लॉग इन करून संपर्क साधू शकतात. किंवा, सदस्य +९१ ८१० ८११ ६७६७ वर आरटीएशी संपर्क साधू शकतात.

एलटीएम लिमिटेडसाठी
(पूर्वीचे एलटीआय माइंडट्री लिमिटेड)

अंगना अरोरा
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
एसीएस-१७७४२

स्थळ: मुंबई
दिनांक: १९ ऑगस्ट, २०२६

KALCiyog® Tablets www.dhoutiyog.co.in

आता नवीन आकर्षक पॅकमध्ये

मजबूत हाडे, मजबूत जीवन
धौतीयोग चे प्रभावी उत्पादन

साइड इफेक्ट्स नाहीत

किंमत ₹ 374/-

सिद्ध कॅल्सीयोग® टॅब्लेटस्

शुद्ध आयुर्वेदिक औषध, अश्वगंधा, शतावरी, अर्जुन साल घन, शंख, शौक्तिक भस्म इत्यादी प्रभावी घटक...

लोह आणि व्हिटॅमिन सी युक्त शुद्ध आयुर्वेदिक कॅल्शियम टॅब्लेटस्

● हाडांचे आणि सांध्यांचे टॉनिक! ● हात, पाय, कंबर, गुडघे, पाठ, सांधे दुखणे तसेच उठताना, बसताना, चालताना त्रास होणे, पायात गोळे, मुंग्या येणे, बधिरपणा वाटणे यासाठी उत्तम ● स्नायू, लिगामेंट दुखापतीवर प्रभावी ● केस गळणे कमी होते

सर्व मेडिकल, आयुर्वेदिक शॉपमध्ये तसेच **Amazon** वर उपलब्ध.

संपर्क - डॉ. अभिजीत (आयुर्वेदाचार्य) 9422011723, 9881970633

● हे औषध www.dhoutiyog.co.in वर घरपोच मिळवू शकता.
● शिपिंग चार्जेस नाहीत. ● कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध !

निर्माते - **सिद्ध फार्मा,** पुणे, GMP Certified Company

एक्झिट ऑफरची सार्वजनिक घोषणा

भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (इक्विटी शेअर्सची सूचीतून वगळणी) नियमावलीच्या प्रकरण V नुसार,
टेक्नोमिन ॲक्वा एक्सपोर्ट्स (इंडिया) लिमिटेडच्या भागधारकांच्या लक्षार्थ
CIN: U05005AP1991PLC013579
नोंदणीकृत कार्यालय : दरवाजा क्र. ५९-११-५, गायत्री नगर, दुसरी गल्ली, व्हीजे पॉलिटेक्निक, कृष्णा, विजयवाडा (शहरी), आंध्र प्रदेश, ५२०००८, भारत.
ईमेल: teknominaqua@gmail.com; वेबसाइट: www.teknominaqua.co.in
दूरध्वनी: ०८६६-२५७७२२२, संपर्क व्यक्ती: टी व्यंकट राव

ही सार्वजनिक घोषणा ('पीए') अधिग्रहणकर्ते, श्री. मस्तान राव पेराम, प्रवर्तक यांच्याद्वारे जारी केली जात आहे.

टेक्नोमिना ॲक्वा एक्सपोर्ट्स (इंडिया) लिमिटेड ('कंपनी'), जिचे इक्विटी शेअर्स, एक्झिट ऑफर देण्यासाठी आणि कंपनीच्या भागधारकांकडील इक्विटी शेअर्स अधिग्रहित करण्यासाठी, बीएसई लिमिटेडद्वारे सेबी (इक्विटी शेअर्स डिलिस्टिंग) नियमावलीच्या प्रकरण V नुसार सक्तीने डिलिस्ट करण्यात आले. कंपनी बीएसई लिमिटेडवर सूचीबद्ध होती; तथापि, पूर्वीच्या लिस्टिंग कराराच्या आणि लागू लिस्टिंग नियमांच्या काही तरतुदींचे पालन न केल्यामुळे १२ जानेवारी, १९९८ पासून तिच्या सिक्युरिटीजमधील ट्रेडिंग निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर, सेबी (इक्विटी शेअर्स डिलिस्टिंग) नियमावलीच्या प्रकरण V नुसार, १६ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या डिलिस्टिंग आदेशान्वये, टेक्नोमिना ॲक्वा एक्सपोर्ट्स (इंडिया) लिमिटेडचे इक्विटी शेअर्स १७ ऑगस्ट २०१६ पासून बीएसई लिमिटेडमधून सक्तीने डिलिस्ट करण्यात आले.

बीएसई लिमिटेडने सेबी (इक्विटी शेअर्सची डिलिस्टिंग) नियमांनुसार आपल्या तज्ज्ञ मूल्यांकनकर्त्यांच्या पॅनेलमधून एका स्वतंत्र मूल्यांकनकर्त्याची नियुक्ती केली. स्वतंत्र मूल्यांकनकर्त्याने टेक्नोमिना ॲक्वा एक्सपोर्ट्स (इंडिया) लिमिटेडच्या इक्विटी शेअर्सचे योग्य मूल्य, प्रवर्तकाने देय असलेल्या किमतीनुसार, प्रति पूर्ण भरणा झालेल्या इक्विटी शेअर ०.२० (फक्त वीस पैसे) असे निश्चित केले.

उपरोक्त डिलिस्टिंग आदेशाचे आणि सेबी (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियमावलीच्या लागू तरतुदींचे पालन करण्यासाठी, प्रवर्तक आता भागधारकांना प्रति इक्विटी शेअर ०.२०/- (फक्त वीस पैसे) या दराने एक्झिट ऑफर देत आहेत, जे स्वतंत्र मूल्यांकनकर्त्याने निश्चित केलेले योग्य मूल्य आहे आणि सेबी (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियमावलीचे पालन करून हे ठरवले आहे.

टेक्नोमिना ॲक्वा एक्सपोर्ट्स (इंडिया) लिमिटेडचे प्रवर्तक, श्री. मस्तान राव पेराम, याद्वारे कंपनीच्या भागधारकांना निर्गमन प्रस्ताव (एक्झिट ऑफर) देत आहेत. भागधारक खालीलप्रमाणे करू शकतात:

१. एक्झिट ऑफरमध्ये त्यांचे शेअर्स प्रति शेअर **रु. ०.२०/- (फक्त वीस पैसे) या किमतीला सादर करा.**

सार्वजनिक घोषणेच्या तारखेनुसार भागधारकांची रचना:

श्रेणी	इक्विटी शेअरधारकांची संख्या	धारण केलेल्या समभागांची संख्या
प्रवर्तक आणि प्रवर्तक गट	१६	१२१७३००
एकूण पेड अप कॅपिटल	१२३५९	४३५२७५०
सार्वजनिक भागधारक	१२३७५	५५७००५०

एक्झिट ऑफर लेटर सर्व भागधारकांना त्यांच्या पत्त्यावर आणि कंपनीकडे नोंदणी केलेल्या त्यांच्या ईमेल आयडीवर पाठवले जाईल. जर कोणत्याही भागधारकाला एक्झिट ऑफर लेटर मिळाले नाही, तर ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात संपर्क साधू शकतात.

कंपनीच्या भागधारकांना खालील नमूद माहितीनुसार त्यांचे इक्विटी शेअर्स श्री. मस्तान राव पेराम (प्रवर्तक) यांच्याकडे सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे:

ऑफर किंमत	प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ०.२०/- (फक्त वीस पैसे)
एक्झिट ऑफर कालावधीची सुरुवात	२७.०८.२०२६
एक्झिट ऑफर कालावधीची समाप्ती	२६.०९.२०२६

टीप: एक्झिट विंडो बंद झाल्यापासून १५ कामकाजाच्या दिवसांच्या आत भागधारकांना रक्कम अदा केली जाईल.

एक्झिट ऑफरसाठी प्रक्रिया

भागधारकांना विनंती आहे की, त्यांनी 'एक्झिट अर्ज', रीतसर अमलात आणलेले आणि स्वाक्षरी केलेले हस